क्र.महानिर्मिती/आअ(मासं-२)/रवका /
प्रकाशगड, २ रा मजला, बांद्रा (पूर्व),
***मुंबई - ४०० ०५१.***

# ***प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४७ दिनांक ०६-१०-२००७***

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचित कंपनीच्या कर्मचा-यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मभवा-११०७/प्र.क्र.१२/सेवा-९ दिनांक २४/९/२००७ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दिनांक ०१/७/२००७ पासून वेतन श्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनावर ३५% ऐवजी ४१% या सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित मधील सर्व कर्मचा-यांना मुळ वेतनाच्या ८५% ऐवजी ९१% दराने दिनांक ०१-७-२००७ पासून महागाई भत्यात वाढ देण्याबाबत संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांनी मंजुरी दिली आहे.

४. महागाई भत्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधीत विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

५. संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी, महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), महानिर्मिती, प्रकाशगड, वांद्रे, २ रा मजला, मुंबई - ४०० ०५१ यांचेकडे त्वरित मागणी करावी.

***(जयंत तोताडे)***
***मुख्य महाव्यवस्थापक(मासं)***

***प्रत :-***

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या प्रेषण यादीप्रमाणे.